# भारतीय विद्यामंदीर द्वारा संचालित
# भारतीय महाविद्यालय, मोर्शी

भारतीय विद्यामंदीर द्वारा संचालित भारतीय महाविद्यालय मोर्शी येथे ICSSR प्रायोजित विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे 44 वार्षिक अधिवेशन दि 1 व 2 फेब्रु. 2020 रोजी आयोजित करण्यात आले. त्याचा आढावा पुढिलप्रमाणे :–

## दि. 1 फेब्रु. 2020

भारतीय महाविद्यालय मोर्शी द्वारा आयाजित विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या 44 वार्षिक अधिवेशनाप्रसंगी दि. 1 फेब्रु. 2020 ला सकाळी 10.30 वाजता उदघाटन समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय विद्यामंदीर, अमरावतीचे अध्यक्ष मा. डॉ. रमेश भ. बिजवे, परिषदेच्या अध्यक्ष मा डॉ मृणालीनी फडणवीस (कुलगुरू, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठ, सोलापूर), कार्यक्रमाचे उदघाटक मा. डॉ. मुरलीधरजी चांदेकर (कुलगुरू, संत गाडगेबाब अमरावती विद्यापिठ, अमरावती), प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सरचिटणीस मा. ॲड. यदुराजजी मेटकर, कोषाध्यक्ष मा. डॉ. आराधना वैद्य, मा. डॅा. सतिश कुळकर्णी हे होते. स्वागताध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. सुरेश भ. बिजवे हे होते. या कार्येककार्चे उदघाटक म्हणून बोलतांना मा. डॉ. मुरलीधरजी चांदेकर यांनी परिषदेसाठी योग्य अशा विषयाची निवड करून त्या विषयाशी संबंधित जे काही संशोधन होईल त्याचा अहवाल सरकारकडे पाठवून रोजगारासंदर्भात आणखी काय पाउले उचलता येतील याकडे लक्ष देण्याची गरज आहे असे मत व्यक्त केले

परिषदेच्या अध्यक्ष मा. डॉ. मृणालीनी फडणवीस यांनी इथल्या भागात असलेल्या पर्यटन क्षेत्राशी निगडीत व्यवसाय रोजगार उभारता आला तर तो उभारला पाहिजे असे विचार व्यक्त केले. उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. रमेश भ. बिजवे यांनी परिषदेसठी घेण्यात आलेल्या विषयाची यथासांग चर्चा होउन त्यावरील संशोधन. निष्कर्ष व शिफारशी सादर कराव्या असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकेमधून महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच परिषदेचे स्वागताध्यक्ष मा. डॉ. सुरेश भ. बिजवे यांनी परिषद घेण्यामागची भूमिका व उद्देश समजावून सांगितले. या उदघाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. विनायक देशपांडे यांनी तर आभारप्रदर्शन श्री. साकेत चिंचमलातपुरे यांनी मानले

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

दुपारी 2.00 वाजता अधिवेशनाच्या पहिल्या चर्चासत्रामध्ये जागतिक मुक्त व्यापार व WTO चे यशापयश या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये एकुण 14 शोधनिबंधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. त्यामध्य WTO च्या वेगवेगळया दृष्टीकोनातून प्रत्येक संशोधकाने विचार केला. प्रसिध्द अर्थतज्ञ मा डॉ. श्रीनिवास खांदेवाले सर यांनी याविषयावर आपले विचार व्यक्त करतांना Global Value Chain , Income subsidy ,Price subsidy या दोहोंचा विचार पुन्हा आवश्यक आहे, वैचारिक प्रक्रीयेमध्ये बदल आवश्यक, गरजपेक्षा जास्त उत्पादन पण विकायचे कसे हा प्रश्न, वसाहतवाद,साम्राज्यवाद अजूनही सुरू आहे अशा अनेक मुद्यांचा विचार केला. परिषदेच्या अध्यक्ष मा. डॉ. मृणालीनी फडणवीस यांनी केंद्रशासनाला रिपोर्ट देणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले

या पहिल्या चर्चासत्राचे सत्राध्यक्ष म्हणून डॉ. दिपक श्रृंगारे परकीय आक्रमण, व्यापार, 1929 ची जागतिक महामंदी असे व्यापाराचे अनेक टप्पे, WTO चे यश व अपयश याचा आढावा घेतला. या सत्राचे सुत्रसंचालन डॉ. धिरज कदम यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. रविंद्र शेंडे यांनी मानले.

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या 44 व्या वार्षिक अधिवेशनाच्या दुस–या चर्चासत्रामध्ये "वर्तमानकाळात भारतातील रोजगाराचे बदलते स्वरूप" या विषयावर एकुण 7 शोधनिबंधकांनी आपला शोधनिबंध सादर केला यामध्ये ग्रामीण भागातील व्यवसाय, भारतातील सद्यस्थिती, बदलते स्वरूप, बदलती श्रमशक्ती, रोजगारीचे स्वरूप व माध्यमे इ. विषयावर संशोधकांनी आपले विचार व्यक्त केले. परिषदेच्या अध्यक्षा मा. डॉ. मृणालीनी फडणवीस यांनी रोजगारीच्या बदलत्या स्वरूपाची चर्चा केली. या सत्राचे सत्राध्यक्ष म्हणून डॉ. जयराम गायकवाड होते. सूत्रसंचालन डॉ. प्रशांत टावरी यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. पंकज तायडे यांनी मानले

सायंकाळी 5.30 वाजता प्रा.नाणेकर–प्रा.पिंपरकर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानाकरिता वक्ते म्हणून प्रा. डॉ. के. व्हि. ब-हाटे होते. त्यांनी सामान्य व्यवहार करित असतांना अर्थशास्त्र कसे उपयोगाचे ठरते हे अनेक दाखले व उदाहरण तसेच अनेक अर्थतज्ञांच्या अर्थविषयक विचारातून पटवून दिले. सायं. 6.30 वाजता आमसभा होउन विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या पहिल्या दिवसाची सांगता झाली

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

## रविवार दि. 2 फेब्रु. 2020

विदर्भ अर्थशास्त्र परिषदेच्या 44 व्या अधिवेशनाच्या दुस–या दिवशी सकाळी 9.30 वाजता "आर्थिक ग्रंथातील विचारविश्व" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. वक्ते म्हणून डॉ. आर.वाय. माहोरे सर हे होते त्यानी या विषयावर आपले विचार व्यक्त करतांना विविध अर्थशास्त्रज्ञाचे आर्थिक विचार मांडून ते प्रत्यक्षात कसे उतरविता येतील याचा आपल्याला विचार करावा लागेल असे सांगितले

सकाळी 11.00 वाजता परिषदेच्या तिस–या चर्चासत्रामध्ये "विदर्भातील जिल्हा निहाय नियोजनविकास मंडळ कार्याचा आढावा (जिल्हानिहाय)" या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. यामध्ये 4 संशोधकानी आपले शोधनिबंध सादर केले. संशोधकानी यामध्ये जिल्हानिहाय त्या जिल्हयातील समस्या, विकासातील अडचणी याविषयीचा आढावा घेतला या चर्चासत्राचे सत्राध्यक्ष म्हणून डॉ. विठठल घिनमिने हे होते. सूत्रसंचालन प्रा. दिपाली पडोळे यांनी तर आभारप्रदर्शन डॉ. वनिता चोरे यांनी केले. त्यानंतर प्रसिध्द अर्थतज्ञ मा. डॉ. श्रीनिवास खांदेवाले यानी बजेट 2020 यावर आपले विचार व्यक्त केले.

परिषदेची सांगता 2 फेब्रु. ला करण्यात आली या समारोपीय कार्यकमाला कार्यकमाचे अध्यक्ष म्हणून मा. डॉ. बी. एस. चंदनकर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. सुखदेवराव राउत, मा. श्री. नविनकुमार पेठे स्वागताध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. सुरेश भ. बिजवे. परिषदेच्या अध्यक्षा मा. डॉ. मृणालीनी फडणवीस होत्या. त्यांनी अध्यक्षीय भाषणातून संपूर्ण कार्यकमाचा आढावा घेउन मोर्शी भागात असलेल्या पर्यटन व त्यासंबंधित बाबींच्या विकासाकडे लक्ष देउन ते जतन करण्याचे आवाहन केले.

कार्यकमाचे सुत्रसंचालन श्री. रामदास इंगळे यांनी केले प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश भ. बिजवे यानी तर आभारप्रदर्शन परिषदेच्या समन्वयक अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. लाजवंती आर. टेंभुर्णे यांनी मानले. कार्यकमाला मा. डॉ. दि. व्य. जहागिरदार, मा. डॉ.मुक्ता जहागिरदार, मा. डॉ. आर. वाय. माहोरे. प्रसिध्द अर्थतज्ञ मा. डॉ.श्रीनिवास खांदेवाले. परिषदेचे कार्याध्यक्ष मा. डॉ.निवृत्ती पिस्तुलकर. परिषदेचे सचिव मा. डॉ.विठठल घिनमिने, मा. डॉ.राजेश चव्हाण. परिषदेचे माजी अध्यक्ष मा. डॉ.कुळकर्णी मॅडम. मा. डॉ. वनिता चोरे. नवनिर्वाचित अध्यक्ष मा. डॉ.विनोद गावंडे, उपाध्यक्ष मा. डॉ.प्राची

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

देशपांडे, मा. डॉ.संतोष कुटे या सर्वांचा श्रीफळ व स्मृतीचिन्ह देउन सत्कार करण्यात आला.त्याचप्रमाणे आचार्यप्राप्त संशोधकांचा सुध्दा याप्रसंगी श्रीफळ व स्मृतीचिन्ह सत्कार करण्यात आला. या परिषदेला विदर्भातील एकुण 112 संशोधकांनी आपला सहभाग नोंदविला. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi

भारतीय विद्यामंदिर अमरावती व्दारा संचलित

# भारतीय महाविद्यालय मोर्शी जि. अमरावती

आयसीएसएसआर प्रायोजित

## विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन

## दिनांक 1 व 2 फेब्रू 2020



विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेश्न प्रसंगी प्रास्ताविक करताना महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. सुरेश भ. बिजवे



विदर्भ अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी उद्घाटकीय भाशण करताना संगाबा अमरावती विद्यापिठ अमरावतीचे कुलगुरू मा. डॉ.मुरलीधर चांदेकर



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi



अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी प्रमुख अतिथी मार्गदर्शन करताना भारतीय विद्यामंदिर अमरावतीचे अध्यक्ष मा. डॉ. रमेश बिजवे



अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी अर्थभारती स्मरणिकेचे प्रकाशन करताना मान्यवर



अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी परीषदेच्या अध्यक्षा पुण्य लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापिठाच्या कुलगुरू मा. डॉ. मृणालिनी फडणविस



Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi



अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी आभार व्यक्त करताना परीशदेच्या समन्वयक मा. डॉ. लाजवंती टेंभूर्णे



अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी विचारमंचावर उपस्थित मान्यवर



अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी मार्गदर्शन करताना सुप्रसिध्द अर्थतज्ञ मा. श्रीनिवास खांदेवाले सर

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi



अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा. दि. व्य. जहागिरदार सर



अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी मार्गदर्शन करताना मा. डॉ. ब-हाटे





अर्थशास्त्र परिषदेचे 44 वे वार्षिक अधिवेशन प्रसंगी उपस्थित मान्यवर व सहभागी प्राध्यापक

Principal
Bhartiya Mahavidyalaya
Morshi